**जलसंपदा विभागातील सचिव व सचिव समकक्ष दर्जाचे कार्यकारी संचालक/महासंचालक या संवर्गाची दि.०१.०१.२०२५ रोजीची तात्पुरती ज्येष्ठता यादी प्रसिध्द करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**जलसंपदा विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक : कासंज्ये १४२५/प्र.क्र.२५/ आ(वर्ग-१)**
मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक: २८ जुलै, २०२५.

**संदर्भ :** १) महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियमावली,२०२१.
२) जलसंपदा विभाग, शासन परिपत्रक क्रमांक: कासंज्ये १४२४/प्र.क्र.२८/आ(वर्ग-१), दि.२२.०२.२०२४.

**शासन परिपत्रक :**

महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियमावली, २०२१ अन्वये शासन सेवेतील अधिकारी /कर्मचाऱ्यांची ज्येष्ठतायादी प्रत्येक वर्षी तयार करणे व प्रसिध्द करणे यांबाबतचे सर्वंकष धोरण/नियम निश्चित करण्यात आले आहे. त्यानुसार संदर्भ क्र.२ येथील दि.२२.०२.२०२४ रोजीच्या परिपत्रकान्वये जलसंपदा विभागातील सचिव व सचिव समकक्ष दर्जाचे कार्यकारी संचालक/ महासंचालक या संवर्गाची दि.०१.०१.२०२४ रोजीची तात्पुरती ज्येष्ठता यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे.

२. आता, सदर संवर्गाची दि.०१.०१.२०२५ रोजीची तात्पुरती ज्येष्ठता यादी सामान्य प्रशासन विभागाने संदर्भ क्र.१ अन्वये निश्चित केलेल्या धोरणानुसार सोबत जोडलेल्या **परिशिष्ट-अ** प्रमाणे प्रसिध्द करण्यात येत आहे.

३. सचिव व सचिव समकक्ष दर्जाच्या कार्यकारी संचालक /महासंचालक संवर्गाची दि.०१.०१.२०२५ रोजीची सदर तात्पुरती ज्येष्ठतायादी ही मा.उच्च न्यायालयाने याचिका क्र.२७९७/२०१५ वर दिलेल्या न्यायनिर्णयानुसार तसेच यासंदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये दाखल केल्या गेलेल्या व प्रलंबित असलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र. २८३०६/२०१७ वरील अंतिम न्यायनिर्णयाच्या अधीन राहून प्रसिध्द करण्यात येत आहेत. उपरोक्त न्यायालयीन प्रकरणांमधील अंतिम न्यायनिर्णयानुसार सन २००४ नंतरच्या निवडसूच्यांमध्ये बदल झाल्यास त्यानुसार ज्येष्ठतायादीमध्ये बदल होईल.

४. परिशिष्ट-अ मधील अधिकाऱ्यांपैकी अ.क्र. ५ ते ८ येथील अधिकाऱ्यांना शासन आदेश दि.११.१०.२०२४ रोजी मुख्य अभियंता(स्था) संवर्गातून सचिव व सचिव समकक्ष दर्जाचे कार्यकारी संचालक/महासंचालक संवर्गात पदोन्नती झाली असून सदर अधिकारी पदस्थापनेच्या पदावर सद्यस्थितीत रुजू झाले आहेत. त्यामुळे सदर अधिकाऱ्यांचा दि.०१.०१.२०२५ रोजीच्या प्रस्तुत ज्येष्ठता सूचीमध्ये स्थान दर्शविण्यात आलेले आहे.

५. सदर ज्येष्ठता यादीबाबत काही त्रुटी/आक्षेप असल्यास हे परिपत्रक निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत लेखी स्वरुपात आवश्यक त्या कागदपत्रांसह विहित मार्गाने शासनाच्या निदर्शनास आणाव्यात.

६. सदर शासन परिपत्रक व ज्येष्ठतासूची महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आली असून, त्याचा सांकेतांक क्रमांक २०२५०७२८१८०२०५८५२७ असा आहे. तसेच सदरचे शासन परिपत्रक जलसंपदा विभागाच्या www.wrd.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर देखील उपलब्ध करण्यात आलेले आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.**

ANIL VITTHAL DEOKATE

Digitally signed by ANIL VITTHAL DEOKATE
DN: CN = ANIL VITTHAL DEOKATE, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = WATER RESOURCES DEPARTMENT
Date: 2025.07.28 18:03:19 +05'30'

**(अनिल देवकाते)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

**सोबत : परिशिष्ट अ**

**प्रत,**

१. अपर मुख्य सचिव (जलसंपदा), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
३. सचिव (लाक्षेवि /प्रकल्प समन्वय), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, बेलापूर, नवी मुंबई
५. महासंचालक/ सर्व कार्यकारी संचालक, जलसंपदा विभाग
६. मा.मंत्री जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामडळ) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
७. मा.मंत्री जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
८. सर्व मुख्य अभियंता (स्थापत्य), जलसंपदा विभाग, नाशिक.
९. सर्व संबंधित अधिकारी.

कार्यासन आ(वर्ग-१) संग्रहार्थ.

# परिशिष्ट-अ

शासन परिपत्रक, जलसंपदा विभाग, क्रमांक कासंज्ये १४२५/प्र.क्र.२५/आ(वर्ग-१), दि.२८.०७.२०२५ सोबतचे परिशिष्ट

संवर्गाचे नाव:- सचिव व सचिव समकक्ष - कार्यकारी संचालक/ महासंचालक संवर्ग

वेतनश्रेणी:- S३० (१४४२००-२१८२००)

दि.०१ जानेवारी, २०२५ रोजीची तात्पुरती ज्येष्ठतासूची.

| अ.क्र. | ज्येष्ठता क्रमांक | अधिकाऱ्याचे नाव (सर्वश्री) | नियुक्तीचा मार्ग | जन्मदिनांक | प्रवर्ग | नियम३ (२) नुसार संवर्गात प्रत्यक्ष रुजू दिनांक | ज्येष्ठतेचा दिनांक/ मानीव दिनांक | सेवा निवृत्तीचा दिनांक | शैक्षणिक अर्हता | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| १ | १ | श्री.प्रमोद गोविंदराव मांदाडे | पदोन्नती | ०८.०३.१९६७ | इ.मा.व. | ०१.१२.२०२२ | ०१.१२.२०२२ | ३१.०३.२०२५ | बी.ई.(स्था.) | |
| २ | २ | डॉ. संजय मधुकर बेलसरे | पदोन्नती | ०६.०६.१९६८ | इ.मा.व. | १५.१२.२०२२ | ०१.१२.२०२२ | ३०.०६.२०२६ | एम.ई.पी.एच.डी. | |
| ३ | ३ | श्री.संतोष रामकिशन तिरमनवार | पदोन्नती | २५.०४.१९६८ | खुला | ०१.१२.२०२२ | ०१.१२.२०२२ | ३०.०४.२०२६ | बी.ई.(स्था.) | |
| ४ | ४ | श्री.अतुल अशोक कपोले | पदोन्नती | ०८.०२.१९६८ | खुला | ०१.१२.२०२२ | ०१.१२.२०२२ | २८.०२.२०२६ | एम.ई.(स्था.) | |
| ५ | ५ | श्री.राजेश श्रीराम सोनटक्के | पदोन्नती | ०७.०९.१९६८ | खुला | ०७.०४.२०२५ | ०६.०३.२०२५ | ३०.०९.२०२६ | बी.ई.(स्था.) | |
| ६ | ६ | श्री.प्रकाश खंडेराव पवार | पदोन्नती | ०९.०३.१९६७ | खुला | ०६.०३.२०२५ | ०६.०३.२०२५ | ३१.०३.२०२५ | बी.ई.(स्था.) | |
| ७ | ७ | श्री.हनुमंत विठ्ठलराव गुणाले | पदोन्नती | १७.१२.१९६७ | खुला | १३.०६.२०२५ | ०७.०४.२०२५ | ३१.१२.२०२५ | बी.ई.(स्था.) | |
| ८ | ८ | श्री.अभय लक्ष्मण पाठक | पदोन्नती | ०३.०६.१९६७ | खुला | ०७.०४.२०२५ | ०७.०४.२०२५ | ३०.०६.२०२५ | बी.ई.(स्था.) | |

ANIL VITTHAL DEOKATE

Digitally signed by ANIL VITTHAL DEOKATE
DN: CN = ANIL VITTHAL DEOKATE, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = WATER RESOURCES DEPARTMENT
Date: 2025.07.28 18:03:29 +05'30'

(अनिल देवकाते)

उप सचिव, महाराष्ट्र शासन